# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३६७४**

**अपिलार्थी श्री. अजय माहुले**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (औषधे-१)**
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,
नवीन गोकुळदास तेजपाल संकुल, ९ वा मजला,
एल.टी.मार्ग, मुंबई- ४०० ००१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव (औषधे-१)**
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,
नवीन गोकुळदास तेजपाल संकुल, ९ वा मजला,
एल.टी.मार्ग, मुंबई- ४०० ००१

**<u>द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०६.०३.२०२६</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २७.०६.२०२४ | २८.०६.२०२४ | १२.०८.२०२४ | ३०.०९.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २०.१२.२०२४ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २८.०६.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ३०.०९.२०२४ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. २७.०६.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"न्यायालयीन कामासाठी (मा. उच्च न्यायालये खंडपीठ औरंगाबाद येथील civil application no. ४६२१/२०१५ व contempt petition no. ६५२/२०२२) खालील माहिती शीघ्र अति शीघ्र देण्यात यावी ही विनंती.*

*अजय मंगलप्रसाद माहुले यांनी (मी) औषध निरीक्षक पदाच्या जाहिराती अनुषंगे MPSC ला सादर केलेल्या अनुभव प्रमाणपत्रांच्या फेरपडताळणी बाबत वर्ष २०१५ ते माहिती देण्याच्या दिनांक पर्यंत अन्न व औषध प्रशासन, (म. राज्य) यांचे कडून वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये, मुंबई यांना प्राप्त झालेले अहवाल, अभिप्राय, निष्कर्ष व टिप्पणी यांच्या साक्षांकित प्रती. तसेच वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांनी त्या अनुषंगे MPSC यांच्याशी केलेला पत्रव्यवहार आणि त्यानुषंगे MPSC द्वारे प्राप्त झालेले अहवाल, अभिप्राय, निष्कर्ष व टिप्पणी यांच्या साक्षांकित प्रती."*

..२/-

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. २८.०६.२०२४ रोजी अपिलार्थींना कळविले की, आपण मागणी केलेल्या नस्तीवर अद्याप अंतिम कार्यवाही पुर्ण झालेली नाही. सदर प्रकरण सद्यस्थितीत मा. न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ आहे. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दि. २५.०८.२०२२ अन्वये "माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्जदाराकडून कोणतीही माहिती विचारल्यानंतर जो पर्यंत त्यावर अंतिम निर्णय होत नाही तोपर्यंत विचारलेली माहिती सुरक्षितपणे जतन करुन ठेवण्यात यावी असे सुचित केले आहे. यास्तव माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ८(१)(झ) मधील तरतूद व उक्त दि.२५.०८.२०२२ च्या शासन परिपत्रकातील सुचना लक्षात घेता सद्यस्थितीत आपणास माहिती उपलब्ध करुन देणे शक्य होत नाही.

४. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. १२.०८.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ३०.०९.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (औषधे-१) यांनी अपिलार्थी यांच्या अर्जावर विहित कालावधीत उचित कार्यवाही केलेली आहे. अपिलार्थी यांना अपेक्षित असलेल्या माहितीची नस्ती ही सद्य:स्थितीमध्ये कार्यवाही पुर्ण झालेली नसल्यामुळे तसेच सदर प्रकरण मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे न्यायप्रविष्ठ असल्यामुळे व त्यावर कोणताही निकाल आलेला नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे नमुद करुन अपील निकाली काढलेले आहे.

५. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालय यांचे आदेशानुसार अपिलार्थींनी नियुक्तीचे वेळी सादर केलेले अनुभव प्रमाणपत्राची फेरपडताळणी करण्यात आली होती व सदर प्रमाणपत्र खोटे आढळल्याचा अहवाल न्यायालयात सादर केला व पुढील प्रशासकीय कार्यावाही शासन स्तरावर सुरु आहे. अपिलार्थी यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही अंतीम न झाल्याने अपिलार्थींना सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रकातील सुचना तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८(१)(झ) अन्वये माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. तसेच सदर प्रकरणी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून अभिप्राय आवश्यक आहे व नंतर विभागीय चौकशीची कार्यवाही अंतीम करण्यात येईल. तोपर्यंत अपिलार्थींना माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नाही.

६. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

प्रदीप व्यास 6-3-2026

**मुंबई**
**दिनांक : ०६.०३.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**